9 Р
1358
М

राष्ट्रीय अभिलेखागार पुस्तकालय
NATIONAL ARCHIVES LIBRARY
भारत सरकार
Government of India
नई दिल्ली
New Delhi

992/9/21

आह्वानांक Call No. ______

अवाप्ति सं० Acc. No. 1358

वंदे मातरम्.




# महात्माजींचा प्रवास

अथवा–

# मिठाची मोहीम.

## पोवाडा.



लेखक— गोपाळ रामचंद्र संगोराम.

( सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन. )

जून १९३० ] आवृत्ति १ ली [ किं. १ आणा.

IMPERIAL RECORD DEPARTMENT
RECEIVED
11 NOV. 1930

प्रकाशक,—
गोपाळ रामचंद्र संगोराम, निपाणी.

मुद्रक,—
बी. ए. संकेश्वरे ॲन्ड सन्स
प्रोप्रायटर,— श्रीवर्धमान प्रिंटिंग प्रेस, निपाणी.
गुरुवार पेठ घर नंबर ३८८

NATIONAL ARCHIVES LIBRARY
No 1358
Date 12.1.72
GOVT. OF INDIA

# बि नी वा ला.

चला चला बाजुला दूर वाट द्या आधि, वाट द्या आधी ॥
रण करूं निघाले शूर वीरवर गांधी ॥ धृ० ॥
संतत शोभे सुहास्य वक्त्र ॥
तनुवरि एकचि खादीवस्त्र ॥
जवळी शांति-अहिंसा शस्त्र ॥
लाविते वेड ही रोड मूर्ति जरि साधी ॥ १ ॥
सत्यागारिं स्वयंसेवक ॥
जमले मातृभक्त बहुतेक ॥
झाले जाया बहु उत्सूक ॥
शत्रुशीं लढाया हृदय करुनि पोलादी ॥ २ ॥
घ्याया महात्मजींची भेटी ॥
आश्रमद्वारीं कितितरि दाटी ॥
साश्रुलोचन गद्गदकंठीं ॥
बोलती 'शतायू प्रभु करि, हो यश वृद्धी' ॥ ३ ॥

हातीं घेउनि पंचारती ॥
ललना ठायिं ठायिं तिष्ठती ॥
वीरा ओवाळूं वांछिती ॥
द्या मार्ग मधुनि त्या मोडुनिया झट गर्दी ॥ ४ ॥

जमनालाल बजाजी खासे ॥
बिर्ला कोट्याधिश हे ऐसे ॥
चमुला निरोप द्याया हांसें ॥
पातले बापुजिस लौकर द्या कुणी वर्दी ॥ ५ ॥

बजाजी पुत्र वयानें सोळा ॥
तयाचा काय बोलुं बोलबाला ॥
हा पहा गांधिचा चेला ॥
चालला अघाडिस उल्हासिता आनंदी ॥ ६ ॥

प्यारेलाल छगनजीलाल ॥
सैनिक बहात्तरांचा मेळ ॥
दलपति शोभे 'मोहनलाल' ॥
झट करा नमन त्या दवडुं नका ही संधी ॥ ७ ॥

३.

# महात्माजींचा प्रवास
अथवा
# मिठाची मोहीम

शस्त्राविणही शत्रूवरती चढाइ ती कैसी ? ॥ महात्मजीं-
च्या पुण्यप्रतापें शिकवण जगतासी ॥ जी, जी, जी ॥ धृ.॥
हिंदुस्थानावर ओढवले संकट परक्याचे ॥ सुटण्या
त्यातुनि ज्ञान गांधिजी सांगति चरख्याचे ॥ जी, जी,
जी ॥ भारतवर्षीं बहुत ठिकाणीं पिकतो कापूस ॥ असे
असुनि कापडा महाग जन कां चित्ता पूस ॥ जी, जी,
जी ॥ साठ कोटिवर आठ अधिक धन म्यांचेस्टरवाला ॥
प्रतिवर्षी खावुनी आमुचे तुंद धुंद झाला ॥ जी, जी, जी ॥
तत्संरक्षण करण्या इंग्रज तो नव कायदा ॥ करुनि,
भारतिय बुडवुनि रडवुनि हरि बहु संपदा ॥ जी, जी,
जी ॥ आज कुठें डाक्याची मलमल चंदेरी बत्ती ॥ धूर्त
शत्रुनीं हिंद केलेला लाउनि दिलि बत्ती ॥ जी, जी, जी ॥
स्वराज्य रवि तो विलया जातां पारतंत्र्यभूतें ॥ सत्व-
हीन नादान बनविले ' आर्यांच्या भूतें ' ॥ जी, जी, जी ॥
चहुं बाजूनीं हिंद जनाचा यदा कोंडमारा ॥ अनन्यभावें
शरण जाति जन तेव्हां हरिहरा ॥ जी, जी, जी ॥

'पिनाकपाणी परशुधरा भो हरहर महादेवा ॥ तमो-
गुणाचा प्रभाव आतां रिपुला झट दावा ॥ जी, जी, जी ॥
यदुकुलतिलका, विश्वव्यापका, मुकुंद मधुसुदना ॥ अरि-
मद वारुनि करी प्रभुवरा भारतीय अवना ॥ जी, जी, जी॥'

चाल— अशि ऐकुनी दीनवाणी ॥ जी, जी, जी ॥
द्रवला तो चक्रपाणी ॥ जी, जी, जी ॥
ब्रिटिशांचे मर्म जाणी ॥ जी, जी, जी ॥

गर्व तयांचा हरावयाला बलाढ्य शत्रूशीं ॥ जगन्नि-
यंत्यें निर्मियले हो त्या जर्मन देशीं ॥ जी, जी, जी ॥ १ ॥

एकुणशेहे चौदा या सालीं महायुद्ध झाले ॥ तेव्हां बल
किति कोणाचे ते स्पष्ट जगां कळले ॥ जी, जी, जी ॥
अकस्मात 'सबमरीन' आली लंघुनिया खाडी ॥
लंडनावरि टाकुनि गोळे मिरवी रिपु प्रौढी ॥ जी, जी,
जी ॥ जागृत होतां जन हडबडले बडबडले गडबडले ॥
प्राणभयानें धीरवीरही तळघरिं ते दडले ॥जी, जी, जी॥
टेहळणी करि राजधानिवर विमान 'झेपलीन' ॥ क्षणांत
गेला रंग पालटुन मुखें झालि म्लान ॥ जी, जी, जी ॥
भारत देशीं एकाएकीं 'एमडेन' आले ॥ मद्रासाच्या
किल्यावरती वर्षि तोफ गोळे ॥ जी, जी, जी ॥ मागें
पुढती वर आकाशीं जलामधें वैरी ॥ जिकडे तिकडे
दिसे जाहला इंग्रजासि भारी ॥ जी, जी, जी ॥ बेल्जम

देशा विनवुनि कथिती वाट न द्या रिपुला ॥ पुरवुं तुम्हांला दारूगोळा शिपाइ धन विपुला ॥ जी, जी, जी ॥ हिंद्वासिया आंजारोनी गोंजारुनि वदती ॥ शूरवीर धीराग्रणि तुम्ही राजनिष्ठ जगती ॥ जी, जी, जी ॥ संकट समयीं तन-मन-धन ते अर्पुनिया सर्व ॥ यश मिळवुनि देउनी आमुते हरा रिपुगर्व ॥ जी, जी, जी ॥

चाल— संकटीं सहाय्य द्याल ॥ जी...
न विसरूं कालोकाल ॥ जी...
समानची हक्क भोगाल ॥ जी...

गयावया या परी करोनी इंग्रज आक्रोशी ॥ ताटा गेला, पूर्ण नमविले कालानें त्यासी ॥ जी, जी, जी ॥ २ ॥

कठिण प्रसंगी वैरि सांपडे तरि नच मारावे ॥ अभय देउनी पाठिं घालुनी त्यासी तारावे ॥ जी, जी, जी ॥ हिंद्जनाचे बरें नव्हे हें तत्व बुळबुळीत ॥ तारतम्यदृष्टी नच धरितां आपुलाचि घात ॥ जी, जी, जी ॥ धूर्त कुटिलतर कपटि जनानीं जग हें बुजबुजले ॥ तत्व तयांच्या हृदयिं रुजे कां मन ज्यांचे कुजले ॥ जी, जी, जी ॥ साळे भोळे बघुनी ऐसे घरीं शिरती चोर ॥ धन्या धत्तुरा दाउनि खाती मलिदा शिरजोर ॥ जी, जी, जी ॥ संग्रामीं हरि म्हणे, 'अर्जुना, काय बघसि मर्दा ॥ संकटिं वैरी आहे तोंवरि करि त्याचा खुर्दा' ॥ जी, जी,

जी॥ न्याय असो अन्याय असो ते तत्व मनीं ठेवी ॥ रिकाम वेळीं कोलुन पीई सावधान समयीं ॥ जी, जी, जी ॥ 'ब्रिटिशा नमवाया आपत्ती संधि खरी, नान्य' ॥ कंठरवानें कथुनी गेले सूत्र लोकमान्य ॥ जी, जी, जी ॥ पाहुण्या करीं साप मरे तरि इष्ट तेच अमुचे ॥ मरे पाहुणा तरी अम्हांला दुःख काय त्याचे ॥ जी, जी, जी ॥ प्रजानुरंजनिं दक्ष असति जे तेचि धन्य राजे ॥ प्रजा पीडिती परोपरी ते धरणीला ओझे ॥ जी, जी, जी ॥

चाल— ऐकुनी हाक ब्रिटिशाची ॥ जी...
कळवळे वृत्ति गांधीची ॥ जी...
हिम्मत धरुनि मदतीची ॥ जी...

कंबर कसुनी विश्वकुटुंबी उठे प्रेमराशी ॥ संकट समयीं शत्रु-मित्र हा भेद न अणुं ज्यासी ॥ जी, जी, जी ॥ ३ ॥

मरता मरता विजयी झाले इंग्रज बहादूर ॥ अभिवचनें मग दिली तयें ती पळति दूर दूर ॥ जी, जी, जी ॥ एका बोटावरील थुंकी दुसऱ्यावर न्यावी ॥ ही साद्विद्या ब्रिटिशापासुनि जगतानें घ्यावी ॥ जी, जी, जी ॥ अमेरिकेचा प्रेसिडेंटही विलसन या तेढा ॥ पाहुनि, वेडा होउनि मेला फुकटाचि बापुडा ॥ जी, जी, जी ॥ हळु मृदुवचनें बोलुनि बसवी आपलाचि छका ॥ साधी लोकीं कार्य स्वताचें ठकाजि तो पका ॥ जी, जी, जी, ॥ दिली कौन्सिलें आतां म्हणती करा राज्य स्वैर ॥ फल-

निष्पत्ती काय त्यामधें ? जाति जाति वैर ॥ जी, जी,
जी ॥ कुटिल-नीति-संपन्न राजसा अहा राजमान्या ॥
तुझ्या जोडिला कोणि दिसेना तूंचि जगीं धन्या ॥ जी,
जी, जी ॥ जिथें लेखणी थके कवीची, शाहिराचि वाणी ॥
प्रजा प्रेम कळवळा कुठुनि तुज, तूं केवळ वाणी ॥ जी,
जी, जी ॥

चाल— बहुपरी यत्न केला हो ॥ जी...
फोडिला गांधिनें टाहो ॥ जी...
शेवटी पत्र लिहिलें हो ॥ जी...

वीट येउनी निघे लंघण्या मीठ कायद्यासी ॥ स्वताच
झुंझा झुंझाया त्या बलाढ्य शत्रूशीं ॥ जी, जी, जी, ॥४॥
मास मार्च तारीख बारा एकुणशेहे तीस ॥ प्रातःकाळीं
निघति 'बापुजी' चमुसह लढण्यास ॥ जी, जी, जी ॥
धवलयशांकित धवलखादिपट एक जया अंगीं ॥ धवल
भस्मधर हा शिवशंकर काय राजयोगी ॥जी,जी, जी ॥
खादी सदरा मांडचोळणा शिरस्त्राण टोपी ॥ शस्त्र करीं
ते 'शांति-अहिंसा' शिस्त कडक सोपी ॥ जी,जी, जी ॥
प्यारेलाल छगनजीलालजि कर्नल हे चमुचे ॥ सेना-
नायक स्वतः गांधिजी पुढती धीराचे ॥ जी, जी, जी ॥
कुंकुम-तिलका भालप्रदेशीं सकला लावोनी ॥ ओवा-
ळणि झट करूं लागल्या भगिनी येवोनी ॥ जी, जी,
जी ॥ दाटि कितीतरी सांगु तुम्हाला कोण मनुज कुठला ॥

जिकडे तिकडे गर्दि उसळली जन सागर फुटला ॥ जी जी, जी ॥ जयजयकारें अंबर भरलें गांधी शद्वानें ॥ सद्गदीत जन अंतःकरणे भरली लोचने ॥ जी, जी, जी ॥ हस्त पालवुनि निरोप देती फुटेनाच वाचा ॥ अनभिषिक्त हा गांधी राजा धन्य जन्म याचा ॥ जी, जी, जी ॥ हिंद जनाच्या हितार्थ जो हा फकीर होवोनी ॥ निघे महात्मा सोडुनिया निज जिवावरीहि पाणी ॥जी,जी,जी ॥ अल्पवेळ पथिं थांबुनि सांगे सकला सन्मानें ॥ 'आतां परता तुम्ही घरीं जा वागा नियमानें ॥ जी, जी, जी ॥

चाल— परदेशि माल टाकाहो ॥ जी...
दारुला बंदि घाला हो ॥ जी...
मातृ-भू-शपथेला घ्या हो॥ जी...

येतो आतां लोभ असूं द्या लागा कार्यासी ॥ प्रभू कृपा जरि असेल परतुनि भेटूं सकलासी ॥ जी, जी, जी ॥'
॥ ५ ॥

स्वारि निघाली लवाजम्यासह जसी जसी पुढती ॥ जनसमुहाची होउं लागली कमान तशि चढती॥जी,जी,जी॥ अस्लालीहुनि बारेजाव नवागांव पाही॥ लंघुनि गेली फौज पलिकडे दिसे फार घाई॥ जी, जी,जी॥ लावासण मग डमाण नंतर मातर नडियाद ॥ बोरि आवि आनंद नापा गांठति बोरसद ॥ जी, जी, जी ॥ रास कनकापुर महिसागर कारोली गजेरा ॥ सान्नि त्रालसा डेरोल मग

त्या भडोचला मुजरा ॥ जी, जी, जी ॥ अंकलेश्वर साजेद रायमा त्या उमराछीला ॥ छापरभाटा लंघुनि स्वारी गेली सुरतेला ॥ जी, जी, जी ॥ नित्य पांच गांवे पद-चाली चालुनिया नीट ॥ फौज पातली सुखें पहा ती दांडीला थेट ॥ जी, जी, जी ॥ मही नर्मदा कीम तापि मग पापहरा पूर्णा ॥ पृथक् तीन जिल्ह्यांतुनि जातां करीति तीर्थस्नाना ॥ जी, जी, जी ॥ महीसागरीं येउनि भेटति पितापुत्र नेहरू॥ दानशूर सद्भक्त मातृभूहीरधीर-मेरू ॥ जी, जी, जी ॥ सरोजनी, अब्बास तय्यबजी, कस्तुरीबाई ॥ येउनि भेटति पथीं कितीतरि थोर थोर भाई ॥ जी, जी, जी ॥ महीसागरीं त्रास जाहला कर्द-ममय वाट ॥ कीमसागरा सेतु बांधुनी जन करिती थाट ॥ जी, जी, जी ॥

चाल— किति उत्साह लोकांचा ॥ जी…
सांगता थकेची वाचा ॥ जी…
जनिं भरे पूर ऐक्याचा ॥ जी…

पुढील चौकीं तुम्हा सांगतो गांधीवचनासी ॥ श्रवण मनन अभ्यासा करिता पारतंत्र्य नाशी ॥ जी, जी, जी ॥ ६ ॥

जरठ युवा स्त्री पुरुष पथिं ते गांधिजीस नमुनी ॥ आशिर्वच द्या म्हणती त्या दे उत्तर मधु वचनीं ॥ जी, जी, जी ॥ "माझ्यापासुनि बंधुभगिनिनो, अशिर्वाद कसला ॥ तुम्ही इच्छिता मीच भुकेला तुमच्या वच-

नाला ॥ जी, जी, जी ॥ आशोषाचा पहाड तुमचा दांडी-पर्यंत ॥ वृद्धिंगत तो होतां होइल रिपु-बलची शांत ॥ जी, जी, जी ॥ हिंदू, मुस्लिम, ख्रिस्त, पारशी, दिक् पश्चिम प्राची ॥ झुंझ झुंझण्या पूर्ण जरूरी यांच्या ऐक्याची जी, जी, जी ॥ पाकझगी, कुर्बानी, आत्मिय-शुद्धी, बलिदान ॥ करितां होतिल राम रहिम ते पुनरपि अवतीर्ण ॥ जी, जी, जी ॥ गांव तलाटी पाटिलकीचे द्या राजीनामे ॥ इंग्लंडाहुनि गोरे येउनि पाहुंदेत कामें ॥ जी, जी, जी ॥ चला तांतडी मिठागरावर करायास हल्ला ॥ नका आयकू धूर्त घातकी कुटिलांचा सल्ला ॥ जी, जी, जी ॥ वृद्ध, तरुण, बालकावरिहि हा बसत दुष्ट सारा ॥ गिल्ला करुनी हल्ला करुनी यासि दूर सारा ॥ जी, जी, जी ॥ भ्रष्ट नष्ट सैतानी ऐसा असे कुठे कानू ॥ शोधुनि सांगा, धूर्तांचे या दुर्गुण किति वानू ॥ जी, जी, जी ॥ अन्यायी हा मिठावरिल कर जरी बरोबर ॥ हवा पाउसावरहि असा कर बसवा घरोघर ॥ ॥ जी, जी, जी ॥ सूर्य शोषितो जलनिधिचे जल दूर नेइ वारा ॥ 'साल्ट ॲक्ट' त्या लावाया मग भय कां सरकारा ॥ जी, जी, जी ॥

चाल — ब्युरॉक्रसी सैतानशाही ॥ जी...
आश्रयें सौख्य मुळि नाहीं ॥ जी...
मानितो पाप मी पाही ॥ जी...

प्रातःकालीं उठुनि प्रार्थना ईशनिमाजासी ॥ प्रार्थी

ऐसे, 'प्रभो, दुष्ट हें राज्ययंत्र नाशी '॥जी, जी, जी॥ ७॥ बंदीमाजी मला टाकण्या शरम काय वाटे ॥ अजुनि कैद नच करिती, तन्मन शंकित परि मोठे ॥ जी, जी, जी ॥ धरुं जावें तरि चावे, पळतें करितांची त्याग ॥ राहुं दिले मोकाट तरी मी भडकवीन आग ॥ जी, जी, जी ॥ उठा बंधुनो, कसा कंबरा भीति सर्व सोडा ॥ तोडा झटकन गुलामगिरिच्या पायातिल खोडा ॥ जी, जी, जी ॥ बसूं नका घरिं तुम्ही रिकामें फिरवा प्रिय चरखा ॥ सत्य सांगतो याच उपायें मरेल रिपु परका" ॥ जी, जी, जी ॥ रास, सुरतपुर, भडोच येथिल वाक्सुमनें ऐसी ॥ घेउनि माला गुंफुनि अर्पी बंधू भगिनीसी ॥ जी, जी, जी ॥ दांडीग्रामाजवळि स्वागता लष्कर तय्यार ॥ पोलिस आणी पठाण हस्तक सर्वे खबरदार ॥ जी, जी, जी ॥ ससैन्य गांधीसूर्य उगवतां रिपुदल मावळले ॥ प्रभा फांकली सात्विक-बल-यश सकल जगां कळले ॥ जी, जी, जी ॥

चाल— दांडिला मीठ लुटले हो ॥ जी...
आनंदे वीर नटले हो ॥ जी...
परि होतिल पुढति खटले हो ॥ जी...

पाहुनि, ऐकुनि, लिहुनी ते मी नवीन कवनासी ॥ गाइन आतां निरोप द्यावा कवि गोपालासी ॥ जी, जी, जी ॥ ८ ॥

शुभं भवतु

## यापुढें लौकरच प्रसिद्ध होणारी पुस्तकें—

१ **पटेल-बंधु**— या पोवाड्यांत दे. भ. वल्लभभाईचें बार्डोलीतील कार्य व दे. भ. विठ्ठलभाईंची कौन्सिलांतील कामगिरी, राजिनामा व पत्र हे मजकूर येतील.

२ **लढाई व अटक**— पोवाडा.

३ **वारुणी वर्णन**— पिकेटिंगास उत्तेजक असें.
[ विदेशी कापडासंबंधीच्या स्फुट कवितांसह. ]

कर्नाटक प्रांतस्थ साधुशिरोमणी **श्री पुरंदरदास** यांच्या दिव्य प्रासादिक वाणींतून निघालेल्या भक्तिरसात्मक कानडी कवनांचे मराठी काव्यांत केलेलें भाषांतर—

## श्रीदास-शतपदी [ भाग पहिला ]

( सदरहू पुस्तकासंबंधीं विशेष आस्था असणाऱ्यांनीं अगाऊ नांवें कळवावीत. )